(9)

203

**बिनशेती झालेल्या गटातील परवानगी देण्यात आलेल्या मंजूर अभिन्यासातील खुली जागा, व्यक्ती व संस्थांना वितरण करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

महसूल व वन विभाग

शासन परिपत्रक क्रमांक : जमीन ०१/२००६/प्र.क्र.१२/ज-१

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक : २५.५.२००७.

**शासन परिपत्रक :-**

जिल्हाधिकारी, जळगांव यांनी जळगांव जिल्हा हद्दीतील अनेक भूखंड, कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (ग्रामपंचायत, नगरपरिषद, नगरपालिका, इत्यादी) हद्दील समाविष्ट नाहीत. असे (त्रिशंकू) भूखंड वितरण करण्याबाबत शासनाचे निश्चित धोरण नसल्याने याबाबत मार्गदर्शन करावे, अशी विनंती शासनास केली होती. याबाबत नगर विकास विभागाचे आदेशानुसार नगरपरिषद अथवा महानगरपालिका हद्दीतील अकृषिक जमिनीच्या मंजूर अभिन्यासातील खुली जागा व रस्त्यांखालील जागा नगरपालिका / महानगरपालिकेकडे सुपुर्द करण्यात येते. परंतु सदर आदेश नगरपालिका / महानगरपालिका हद्दीबाहेरील किंवा ग्रामीण भागातील अकृषिक अभिन्यासातील खुल्या जागेच्या संदर्भात लागू होत नाहीत.

२. कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीत समाविष्ट नसलेल्या जागेपैकी काही जागांना अकृषिक परवानगी दिल्यानंतर अशा अभिन्यासातील खुल्या जागा / रस्त्याखालील जागा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाकडे सुपुर्द करता येत नाहीत, अशी अनेक प्रकरणे राज्यात असण्याची शक्यता आहे. अशा जागा खाजगी व्यक्तीच्याच नावे राहिल्यास होऊ शकणारे संभाव्य गैरप्रकार विचारात घेता या संदर्भात खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत :-

'अ-नागरी (Non-Urban) भागातील किंवा ग्रामीण भागातील **कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या हद्दीत येत नसलेल्या** जमिनीच्या मंजूर अभिन्यासातील (Sanctioned lay-out) खुली जागा, रस्ते, इत्यादी सार्वजनिक उपयोगासाठी विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र'अद्यापी खाजगी व्यक्तींच्या नावावर अभिलिखित असल्यास असे क्षेत्र सरकारजमा करण्यात यावे. असे क्षेत्र'सरकारजमा केलेनंतर कब्जेदार सदरी महाराष्ट्र शासन आणि इतर हक्कात "Layout open space" किंवा "Layout Road Spaces" असे शेरे घेण्यात यावेत. तथापि या जागा शासनाकडून विकसित केल्या जाणार नाहीत. भविष्यात जेव्हा नगर पालिकेची / महानगरपालिकांची हद्दवाढ होईल किंवा सदर जमीन स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीत समाविष्ट होईल तेव्हा सदरील जागा प्रचलित धोरणानुसार जिल्हाधिकारी यांनी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांकडे वर्ग करण्याची कार्यवाही करावी..

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( प्र. ज. मुळे )

कार्यासन अधिकारी

महसूल व वन विभाग

323

प्रत : सर्व विभागीय ...